To नुपूर from माधुरी.

तात्याना मकारोवा

शूर मुंगळा

तात्याना मकारोवा

शूर मुंगळा

लोककथा

अनुवाद : अनिल हवालदार

चित्रे : गेन्नादी पावलीशिन

लोकवाङ्‌मय गृह प्रा. लि.
मुंबई

राद्रुगा प्रकाशन
मॉस्को

कोणे एके काळी रहात होता एक मुंगळा. तुम्हाला बहुधा जाणून घ्यायची इच्छा असणार, त्याचे नाव काय होते, त्याचे मित्र, त्याचे चाळीस मुलगे व मुली, त्याची लाडकी म्हातारी आई व सरतेशेवटी त्याची काळजी घेणारी बायको, त्याला कोणत्या नावाने हाक मारीत होती. पृथ्वीवर मुंगळ्यांची अनेक नावे अस्तित्वात आहेत आणि मला निदान दहा लाख नावे माहीत आहेत. इल्या, स्तेपान, इवान ह्या नावांचे मुंगळे माझ्या ओळखीचे होते. निकोलाय, अलेक्सान्द्र आणि कोर्नेय ह्या नावांचेही मुंगळे होते... सगळ्यांची आठवण ठेवणे अवघड आहे. पण माझ्या मुंगळ्याला ना सेम्योन म्हणत होते, ना आंद्रेय, ना मत्वेय; त्याला फक्त म्हणायचे मुं – ग – ळा!

पहाटे मुंगळ्या त्यांच्या आरामशीर वारूळात छान साखरझोप घेतात... अर्धवट झोपेत मुंगळ्याने विचार केला: “आमच्या वारूळात वीस कुटुंबं आहेत. सोमवारी निकोल्का कुटुंबानं रानातून पाईनच्या सुया आणल्या. मंगळवारी वरच्या मजल्यावरच्या कुटुंबानं वाळक्या गवताचा भुसा आणला. बुधवारी येर्मोलायची रानात जायची पाळी होती, गुरुवारी सेम्योन खिडक्यांना काचेच्या जागी चिकटविण्यासाठी चतुराचा पंख आणायला गेला. शुक्रवारी पाऊस पडत असूनही येवगेनीने तीन ढलप्या शोधून काढल्या. आणि आत्ता झोपेतून उठायची खरं तर मुळीच इच्छा होत नाही, पण तरीही उठणं प्राप्त आहे – आज शनिवार, आमची पाळी.” मुंगळा ताडकन उठला व स्वत:च्या कुटुंबाला जागे करू लागला: “उठा मंडळी! तोंडं धुवा! सुया गोळा करायला रानात चला!”

सबंध दिवसभर मुंगळा स्वतःच्या कुटुंबासह रानात राबत होता आणि केवळ दिवस मावळला तेव्हाच ते सगळे घराकडे परत निघाले. मुंगळा फरच्या सहा सुया वाहून आणत होता, त्याची बायको – तीन. मुंगळ्याच्या मुलग्यांना झऱ्यापाशी दोन काड्या सापडल्या आणि मुलींना – फरच्या फळां-ची टरफले. सगळ्यात धाकटा मुलगा पानाचा देठ वाहून आणत होता व सगळ्यात धाकटी मुलगी – फुलांमधील परागकण. अशा रीतीने ते सगळे घरी निघाले होते – लांबच लांब हिरव्या पाऊलवाटे-

वरून, राईमधून, जंगलामधून आणि शेवटी मुक्कामाला पोहोचले तेव्हा अचानक त्यांना आढळले – त्यांचे घर तेथे नव्हते!

"आश्चर्य आहे ..." मुंगळा चकित झाला होता. "आमचंच मैदान ... मोकळी जागा ... आमचीच माक्याची लाल फुलं ... पण आमचं घर कुठं आहे? वीस कुटुंबांना सामावणारं, उंच, प्रशस्त, सुरेख असं आमचं घर कुठं आहे?" मुंगळा पुटपुटला.

आणि निराशेच्या भरात त्याने सहा अप्रतिम फरच्या सुया जमिनीवर टाकल्या. मुंगळयाची बायको पांढरी-फटक पडली व तिने तीन सुया जमिनीवर सांडल्या. त्याचे सगळे मुलगे थरथर कापू लागले आणि प्रत्येकाने दोन दोन काडया टाकल्या. त्याच्या मुली दुःखी बनल्या आणि फरच्या फळांची टरफले त्यांनी खाली टाकली. तेवढयात गोंधळलेल्या मुंगळयाच्या कुटुंबावर डासाचा बारीक आवाज गुणगुणला:

“अरे ए मुंगळ्या, तू इथं उभा काय राहिलास? सबंध दिवस तू रानात राबत होतास, स्वतःच्या मुलांना त्यांच्या निष्पाप खेळांमधून ओढून नेलंस आणि खेळण्यांऐवजी त्यांच्या दुबळ्या हाती भयानक सुया कोंबल्यास! जरा तुझ्या गरीब बापडचा बायकोवर नजर टाक, फरच्या तीन ओंडक्यांना वाहून आणता आणता ती किती वाळलीय बघ! तुझ्या चिटुकल्या सर्वांत लहान मुलग्यानंसुद्धा प्रचंड देठ आणला! आणि सर्वांत धाकटी मुलगी तीनशे पूड परागकण घेऊन आली! तू जोवर राबत होतास त्या दरम्यान तुझ्या वारूळानं दुसऱ्या रानात जायचं ठरवलं. तुला ना निरोप ठेवला, ना नमस्कार!” हा छोटा डास किती खोटे बोलला होता! खरे तर त्याच्या पंखाखाली एक छोटुकले शारदीय पान दडले होते आणि त्या पानावर वारूळातील इतर मुंगळ्यांनी मुंगळ्याला पत्र लिहिले होते.

अत्यंत वाईट क्षणी मुंगळ्यांनी ते पत्र डासाच्या हवाली केले होते! सर्वांना माहीतच आहे की, डास फार धूर्त आणि विश्वासघातकी असतात. मुंगळ्यांनी पत्र लिहिलेले पान स्वतःच्या पंखाखाली घट्ट लपवून हा डास उडून गेला.

"प्रिय शेजारी मुंगळेबुवा,

अत्यंत नीरस, अप्रिय पण भरीव कारणांपायी आम्हाला गडबडीने आपले घर सोडावे लागत आहे. आम्ही घाईत आहोत. आपण भेटू तेव्हा सर्व खुलासा होईल. इथून उजवीकडे वळल्यानंतर तुम्ही आम्हाला पटकन आणि कोणतीही अडचण न येता शोधू शकाल. मुंगळयाच्या तीनशे पावले अंतरानंतर तुम्हाला तीन अर्धबोडकी ॲस्पची झाडे दिसतील. त्यांच्यापाशी एक फरचा वृक्ष खाली कोसळलेला तुम्ही पहाल. त्याच्या चीकामध्ये तुमची मुले अडकून पडणार नाहीत ह्याची खबरदारी घ्या. फरच्या वृक्षापलिकडे तुम्ही तीन दलदलीच्या टेकाडांना वळसा घाला आणि तिथे आमचे घर आहे. लौकरच भेटू!"

मुंगळा फार एकाकी पडला! ना मित्र, ना शेजारी, ना त्यांच्या काही खुणा, ना त्यांची काही बातमी... हाय, किती एकटा पडला होता तो! स्वतःच्या मुंगळयाच्या आयुष्यात एवढे दुःख त्याने कधीही अनुभवले नव्हते. दुःख करायला त्याला सवडच नव्हती. मुंग्यांचा डोंगर पहाटेच जागा व्हायचा आणि सकाळ-पासून धावपळ करायची, खाली-वर जायची, काम करायची, वस्तू वाहून आणायची, मुलांना शिकवायची त्याला सवय झाली होती... मग केव्हा तो दुःख करीत बसणार?

आत्तासुद्धा त्याला दुःख करीत बसायला सवड मिळाली नाही. लौकरच रात्र पडेल आणि कुटुंबासाठी निवारा शोधला पाहिजे, म्हणून तो विचार करीत होता... बायकोच्या खांद्यावर थोपटत तो ठाम आवाजात म्हणाला: "कसलीही चिंता करू नको. सगळं ठीक होईल. स्वतःच्या कुटुंबाला रात्रीचा निवारा मुंगळा देऊ शकला नाही, असं जगात कधी घडलं नाही! छोटया मुंगळयांसाठी सांगायच्या परीकथांमधल्या मुंग्यासुद्धा कधीही गडबडून जात नाहीत आणि दुःख करत बसत नाहीत."

आणि रात्रीचा निवारा शोधायला मुंगळा निघाला. त्याने सगळे खुंट आणि उंचवटे तपासले, सगळी झाडे आणि झुडूपे धुंडाळली, पण सर्वत्र ओल होती, गैरसोय होती. अचानक रंगीत लेबलवाल्या एका गोल डब्याकडे त्याचें लक्ष गेले. आणि मुंगळा म्हणाला: "मला छान पत्र्याचं छप्पर दिसतंय आणि सुरेख कोरलेलं दार दिसतंय, मला वाटतं मुलांसाठी ह्याहून

उत्तम निवारा दुसरा सापडणार नाही!" आणि तात्काळ त्याने आपल्या सर्व कुटुंबाला ह्या डब्यात रहायला आणले. तेथे त्यांनी रात्रीचा मुक्काम केला आणि सकाळी, सूर्य जरासा वरती येताच, त्याचे पहिले किरण डब्यावर पडले व डबा चमचमू लागला. आणि मुंगळ्याने निर्णय घेतला: "जर सूर्याच्या किरणांनासुद्धा आमचा डबा आवडतो आणि ती त्याच्याशी खेळतात, तर त्याचा अर्थ याहून चांगलं घर जगात दुसरीकडं कुठंही नाही आणि मी इथून जाणार नाही!"

पण कुटुंबाला वाचविणे आवश्यक होते, लौकरात लौकर तेथून निघून जायला हवे होते, कारण बीव्हर प्राण्यांनी नवा बांध घातला होता, झऱ्याचे पाणी ह्या दिशेला वळविले होते व आता कोणत्याही क्षणी पाण्याचा लोंढा वाहात येणार होता, हे मुंगळ्याला सांगणारे तेथे कुणीही नव्हते. म्हणूनच तर त्याचे मित्र त्याची वाट न पाहता नव्या जागी निघून गेले होते. त्याला ह्यापैकी काहीही ठाऊक नव्हते आणि तो आनंदाने नवे घर सजविण्यात रमला होता. दारावर त्याने कोळ्याच्या जाळ्याचा पडदा टांगला आणि त्याच्यावर दवाचे थेंब सुरेख चमकत होते. हिवाळ्यात ऊब मिळावी म्हणून मऊ शेवाळाचे त्याने बिछाने बनविले. घरात संध्याकाळी उजेड असावा म्हणून छतावर त्याने काजवा टांगला. त्याला हे सर्व इतके आवडले की, वास्तुशांतीचा समारंभ साजरा करायचा त्याने निर्णय घेतला. स्वतःच्या चमकणाऱ्या डाब्यावर त्याने सर्वांना उद्देशून निमंत्रण लिहिले.

"पाहुण्यांनो, लक्ष द्या! माझ्या घरी चहापानाला येण्याचे मित्रांना व अनोळख्यांना निमंत्रण देत आहे. प्रिय पाहुण्यांनी संध्याकाळी आठच्या सुमारास यावे."

आणि संध्याकाळी आठ वाजता आनंदाने गोंगाट करीत डब्यामध्ये अनोळखी, पण खूप सुरेख कीटक आले: चतुर आणि पतंग.

जंगलातील प्राणी नवल करीत होते: "सगळे पतंग आणि चतुर गेले तरी कुठं?" त्यांना मैनेने सगळा खुलासा केला: "ते सगळे रुपेरी डब्यात मेजवानी झोडताहेत आणि त्यांची गाणी खूप खूप दूरपर्यंत ऐकू जात आहेत."

प्रत्येकाला पुरेल एवढी जागा,
चहा आणि खमंग वासाचा पाव तेथे होता.

डब्यामध्ये सगळ्यांना भरपूर जागा होती आणि भरपूर खायला होते. पण अशी मौज-मजा चालू असताना, मुंगळ्याच्या थोरल्या मुलग्याला, तांबड-डोक्याला, बाहेर फिरायला जायची लहर आली आणि... उंबरठ्यापाशी तो थिजला. "मुंगळ्यांनो!" घाबरून तो ओरडला. "आपण इथं चहा पितोय, तोवर आपल्याला बुडवलं! आपल्याभोवती पाण्याचा वेढा पडलाय! संकट!"

"महापूर! धावा!" पतंग व चतुर किंचाळले आणि खाणे-पिणे पूर्ण न करताच उघडया दारामधून उडून गेले. पण आमच्या मुंगळयाने

नेहमीप्रमाणे मुंगळ्याला शोभेल अशा रीतीने शांतपणे संकटाला तोंड दिले आणि तो दुःख करीत बसला नाही. इथे दुःख असणार कसे, जर तो स्वतःच्या कुटुंबाला बरोबर घेऊन नदी-वरून डब्यामधून निघाला होता. दुःख करायला त्याला सवडच नव्हती. कशासाठी आणि कुणा-बद्दल दुःख करायचे? सूर्योदयाबरोबरच परत त्याला उठायचे होते, डोलकाठीवर चढायचे होते, शीड उभारायचे होते, सर्वांना वरती बोलवायचे होते, किनाऱ्यापाशी थांबून शिध्याचा नवा साठा घ्यायचा होता, जंगलाचे संशोधन करायचे होते, भेटणाऱ्या मुंगळ्यांशी गप्पा मारायच्या होत्या, त्यांना जलसफरीवर यायला निमंत्रण द्यायचे होते.

नदीवर कधी दूरवर काहीतरी चमकती वस्तू तुम्हाला दिसली का? दूरून कुणाचीतरी बारीक शीळ तुम्ही ऐकली का? दूरवर कुणीतरी गातोय असे तुम्हाला भासले का:

मोठ्ठे कुटुंब आहे माझे.
सगेसोयरे, मित्र आहेत माझे.
मस्त मी जगात जगतोय!
त्यांच्यासह सागरसफर करतोय!
नको मुळीच किनारा मला.
पोरांना शिकवीन पोहायला.
नाही मी स्तेपान, नाही आंद्रेय,
मी नुसता – मुंगळा रे मुंगळा.
मी एक प्रवासी – मुंगळा.

Т. Макарова
ОТВАЖНЫЙ МУРАВЕЙ
на языке маратхи

T. Makarova
A BRAVE ANT
in Marathi

© मराठी अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९८७
सोविएत संघात मुद्रित

रादुगा प्रकाशन
मॉस्को

ISBN 5-05-001327-5